
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
१६५६
८



REFBK-0014067
REFBK-0014067

# मेघदूत

अनुवादक : ना. ग. गोरे

SK

૩૭૯૯૭
ફાટેલ
૩.૩.૯૫
સં.૨૦૫૧
૧૯૯૬

# मेघदूत

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0014067

ना. ग. गोरे

साधना प्रकाशन, पुणें

प्रथमावृत्ति
ऑक्टोबर ४, १९६४

प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनवार पेठ, पुणें २

मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनवार पेठ, पुणें २

किंमत
रुपया एक

# समर्पण

संस्कृतची दहशत घेतलेल्या माझ्या मनांत ज्यांनीं वर्गांत पाऊल ठेवल्यापासून त्याविषयीं गोडी निर्माण केली, ज्यांचें घर हें गीर्वाण भारतीचें माहेर बनलें होतें,

त्या

कै. महादेव पांडुरंग ओक मास्तरांना

वंदनपूर्वक.

# अनुवादाबद्दल दोन शब्द

मेघदूताचा हा अनुवाद प्रकाशित होत आहे हा बराचसा योगा योगाचा भाग म्हटला पाहिजे. गेलीं दोन वर्षे हा अनुवाद माझ्या कपाटांत पडलेला होता. तो कधीं प्रकाशकाच्या हातीं देण्याची वेळ येईल असें मला वाटलें नव्हतें. भल्या भल्यांनीं मेघदूताचा मराठी अनुवाद केला, आपणहि केला. अनुवाद करतांना ज्या सुखमिश्रित प्रसववेदना झाल्या त्यांची आठवण करण्यांतहि आनंद आहे. प्रकाशनाचा आणखी आग्रह आपण कशाला धरावा, असें मनांत येई.

पण पंधरादिवासापूर्वीं सणक यावी तसा मनांत विचार आला. श्री. नवरे सहज म्हणाले कीं ४ ऑक्टोबरला कै. ओक मास्तरांची आम्हीं शिष्य मंडळी त्यांचा नव्वदावा जन्मदिन साजरा करणार आहों. मी म्हटलें अहो, मी देखील जें कांहीं अल्पस्वल्प संस्कृत शिकलों तें त्यांच्याच पायाशीं बसून. मी त्या समारंभाला आलो तर चालेल कां ? ते म्हणाले आवश्य या. मग मला वाटलें कीं आपण त्या समारंभाला रिक्त हस्तें कसें जायचें ? आपण ज्यांच्यापाशीं संस्कृत शिकलों त्यांना तो मेघदूताचा अनुवाद अर्पण केला तर ? मग ठरवलें कीं कपाटांत पडून राहिलेलें तें पुडकें बाहेर काढायचें. पण प्रकाशक ? साधनावाल्यांनीं माझ्या-वर नेहमींच प्रेम केलेलें आहे. त्यांनीं मदत करण्याचें मान्य केलें आणि तीहि अडचण दूर झाली.

मी मेघदूताचा अनुवाद करण्यास प्रवृत्त झालों तोहि असाच योगायोगानें. कै. गुरुवर्य सबनिसांनीं मेघदूताचें भाषांतर केलें होतें. त्यांच्या प्रकाशकांनीं म्हणजे श्री. अनंतराव कुलकर्ण्यांनी

एक दिवस त्याची एक प्रत माझ्या हातीं दिली आणि फर्मावलें कीं यावर साधनेंत परीक्षण लिहा. मी परीक्षण लिहतांना थोडासा भोचकपणा असा केला कीं गुरुवर्य सबनिसांनीं तसा अनुवाद न करतां असा केला असता तर तो अधिक रोचक झाला असता असें म्हणून मी दोन तीन श्लोकांचा अनुवाद नमुन्यादाखल पेश केला. झुपकेदार मिशांचा आणि करड्या मुद्रेचा हा शिस्तप्रिय विद्वान माझ्या धृष्टतेवर कोपल्याशिवाय राहाणार नाहीं असें मला वाटलें होतें. पण माझी कल्पना फोल ठरली. अनंतरावांच्या दुकानांत भेटल्यावर गुरुवर्यांनीं मला सांगितलें कीं तुमच्या सूचना लक्षांत ठेवल्या आहेत.

नंतर भेटले कविवर्य बेंद्रे. त्यांनीं मला सरळच सांगितलें कीं आतां सर्व श्लोकांचा अनुवाद केल्यावाचून तुझी सुटका नाहीं. प्रथम प्रथम ह्या त्यांच्या टोचणीकडे मी दुर्लक्ष केले. पण प्रवासांत मी मेघदूताचें पुस्तक बरोबर नेऊं लागलो आणि एक एक श्लोक केवळ करमणूक म्हणून अनुवादित करूं लागलो. हळू हळू करमणुकीचे रूपांतर ध्यासांत झालें. तरी अनुवाद पुरा व्हायला १९६२ चा एप्रिल महिना उजाडला. जास्तींत जास्त अनुवाद आगगाडीच्या प्रवासांत झाला. शेवटच्या श्लोकाची शेवटची ओळ लिहून पुरी केल्यावर मी खिडकींतून बाहेर पाहिलें तेव्हा आगगाडी यमुना संगमच्या स्टेशनावरून आग्र्याकडे निघाली होती आणि समोर ताजमहालचें मनोज्ञ दर्शन एका वेगळ्याच कोणांतून घडत होतें.

अनुवाद करतांना शक्य तितका तो यथार्थ, सरळ व सुबोध व्हावा आणि त्यांत शक्य तितके मराठी शब्द यावेत

असा प्रयत्न असल्यामुळें नार, आडी (डोंगराचा उतार भाग ) विरडा, गहिरी, सजणी, रायी, सराई असे शब्द न कचरतां मी वापरलेले दिसतील. त्याचप्रमाणें भेकर-डोळे, गळा-मिठी, मदन-पिसे, कमल-शिदोरी असे समासहि योजलेले आहेत. त्यामुळे रसहानी झालेली नसून अनुवादाचा मराठीपणा वाढलेला आहे असा माझा नम्र दावा आहे. हेंहि मोकळेपणाने मान्य केलें पाहिजे की मेघदूतामधील समासांच्या कुपींत भरलेला आशय–गंध अनेक ठिकाणीं डोकें तडकू लागेपर्यंत विचार करूनहि मी मराठींत आणूं शकलों नाही. माझ्या जवळील प्रतींतला चौपन्नावा श्लोक कालिदासासारख्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीच्या महाकवीच्या लेखणीमधून उतरलेला असेल हें न पटल्या कारणानें मी त्याचा अनुवाद केलेला नाहीं.

अनुवादाची रसात्मक बाजू कितपत साधलेली आहे तें रसिकांनीं पाहावयाचें आहे..

१८१३ सदाशिव, पुणें २
४ ऑक्टोबर १९६४

**ना. ग. गोरे**

ग्रा. क्र. १४०८७
संग्रह शाखा

कश्चित् कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात् प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ।
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ।।

एक यक्ष कुणी सेवा चुकतां शाप प्रभु दे त्याचा,
कांता-विरहे दुःसह अधिकच, समय एक वर्षाचा.
महिमा सरतां रामगिरीवर वसला, जेथे रायी
शीतळ गहिऱ्या, उदकहि पावन न्हाल्यानें वैदेही.

२

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी
नीत्वा मासान् कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ।।

कामी कांही कंठी विरही मास वाळली काया,
सुवर्ण-कंकण गळे हातचें, बघे भव्य दृश्या ह्या
आषाढाच्या पहिल्या दिवशीं ढग वेंघुनिया घेतो
गिरीशिखरा जणुं गज मौजेनें धडक्या बांधा दे तो.

३

तस्य स्थित्वा कथमपि पुरः कौतुकाधानहेतो-
रन्तर्बाष्पश्चिरमनुचरो राजराजस्य दध्यौ।
मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ।।

विस्मयकारी घनासमोरी कसा बसा तो ठेला,
ऊर दाटला, मनीं मुग्धसा बघत राहिला त्याला
मेघदर्शनें सुखांत रमल्या मनिंहि भरे हुरहूर
काय दशा मग गळामिठीची सजणी ज्याची दूर ?

४

प्रत्यासन्ने नभसि दयिताजीवितालम्बनार्थी
जीमूतेन स्वकुशलमयीं हारयिष्यन् प्रवृत्तिम् ।
स प्रत्यग्रैः कुटज कुसुमैः कल्पितार्घाय तस्मै
प्रीतः प्रीतिप्रमुखवचनं स्वागतं व्याजहार ।।

श्रावण झडतां सखी बापुडी व्याकुळेल तिज धीर
मेघा हातीं कुशल धाडुनी द्यावा, मनीं विचार.
रानकुड्याचे नववहराचे मेघा अर्पुन झेले
सुखित मनानें सुखद वचानें स्वागत त्याचें केलें.

५

धूमज्योति:सलिलमरुतां संनिपात: क्व मेघ:
  संदेशार्था: क्व पटुकरणै: प्राणिभि: प्रापणीया: ।
इत्यौत्सुक्यादपरिगणययन् गुह्यकस्तं ययाचे
  कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ।।

**वाफ-तेज-जल-धूर अशांचा मुडा* मेघ तो कोठें ?**
**चतुरा हातीं जे धाडावे सांगावे§ ते कोठें ?**
**अधिऱ्या यक्षा इतुकें कोठुन सुचणें, मेघा विनवी,**
**जड चेतन हा भेद न उमजे मदन–पिसें ज्या भुलवी.**

६

जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानां
  जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोन: ।
तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद्दूरबन्धुर्गतोऽहं
  याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ।।

**त्रिखंड कीर्ती थोर पुष्करावर्तक कुळि तव जन्म**
**इंद्राचा तूं इच्छारूपी मंत्री हे मज ज्ञान**
**दुर्दैवाने प्रिया दूर मम म्हणून विनवितों तुज मी**
**साधु-पदीं बरि विफल याचना सफल न अधमाकरवीं**

*मुडा–आंत भात भरून ठेवलेली गवताची गटळी.
§सांगावा–निरोप.

७

संतप्तानां त्वमसि शरणं तत् पयोद प्रियाया :
  संदेशं मे हर धनपतिक्रोधविश्लेषितस्य ।
गन्तव्या ते वसतिरलका नाम यक्षेश्वराणां
  बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिकाधौतहर्म्या ।।

तप्तांचा आसरा घना तूं म्हणूनि ने संदेश
  सखीप्रती मम कुबेरकोपें मी तर वियोग विवश,
यक्षपतीच्या अलकेसी जा जिथें उजळती भवने
  बाह्य उपवनीं स्थित शंभूच्या शिरिंच्या शशांक–किरणें

८

त्वामारूढं पवनपदवीमुद्गृहीतालकान्ता:
  प्रेक्षिष्यन्ते पथिकवनिता: प्रत्ययादाश्वसत्य:
क: संनद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायां
  न स्यादन्योऽप्यह:मिव जनो य: पराधीनवृत्ति: ।।

बटा सारूनी बघतिल तुजसी वाऱ्यावर चढलेला
  विश्वासें पथिकांच्या धनिणी अनुभव त्यां आलेला
की तूं दिसतां कुणी नुपेक्षित आपुली विरही जाया
  पण मी परवश, मजसम कोणी असेल कां लोकीं ह्या ?

वि: नों दि:

९

तां चावश्यं दिवसगणनातत्परामेकपत्नी-
मव्यापन्नामविहतगतिर्द्रक्ष्यसि भ्रातृजायाम् ।
आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां
सद्यःपाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि ।।

अविघ्न जाशिल खचित पाहशिल तव वहिनीस जिवंत
असेल मोजित दिवस सती ती पहात माझी वाट
जेव्हा हळवीं-फूल स्त्री-मनें विरहिं गळाया बघतीं
आशारूपी देठ तयांना बहुधा सावरताती.

१०

मन्दं मन्दं नुदति पवनश्चानुकूलो यथा त्वां
वामश्चायं नदति मधुरं चातकस्ते सगन्धः ।
गर्भाधानक्षणपरिचयान्नूनमाबद्धमालाः
सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाकाः ।।

इष्ट दिशेला झुळझुळ वाहून नेईल तुजला पवन
करील डावीकडे तव सखा चातक मधुमधु गान
गर्भधारणासमय जाणुनी रचतील तरत्या माला
नयन-सुखवत्या धवल बलाका गगनीं तव साजाला

११

कर्तुम् यच्च प्रभवति महीमुच्छिलीन्ध्रामवन्ध्यां
तच्छ्रुत्वा ते श्रवणसुभगं गर्जितं मानसोत्काः।
आ कैलासाद्बिसकिसलयच्छेदपाथेयवन्तः
संपत्स्यन्ते नभसि भवतो राजहंसाः सहायाः ।।

कंद धुमारित, भूमि गाभवित, रिझवित कानां, सखया
येशिल गर्जत, तदा मानसा होतिल उत्सुक जाया
राजहंस मग सवें घेऊनी कोमल कमल-शिदोरी
सोबत करतिल मार्गीं तुजसी नभि कैलासावेरी

१२

आपृच्छस्व प्रियसखममुं तुङ्गमालिङ्ग्य शैलं
वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ।
काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम् ।।

निरोप घ प्रिय मित्र थोर त्या शैला आलिंगुन
उतरणीवरी ज्याच्या ठसले पावन रघुपतिचरण,
प्रतिवर्षीं तव भेटी होतां स्नेह करी जो व्यक्त
वियोग-दुःखें उफाळलेले ऊष्ण अश्रु ढाळीत

१३

मार्गं तावच्छ्रुणु कथयतस्त्वत्प्रयाणानुरूपं ।
संदेशं मे तदनु जलद श्रोष्यसि श्रोत्रपेयम् ।
खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गन्तासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्त्रोतसां चोपभुज्य ।।

ऐक सांगतों प्रथम सुखाचा मार्ग पुढें जाण्यास
कथीन नंतर मधुर ऐकण्या तुला प्रिया-संदेश
थकवा येतां अधुनि मधुनी गिरिशिखरीं टेकावें
हल्लक होतां क्षणिं हलकेसें निर्झरजल सेवावें.

१४

अद्रेः श्रृङ्गं हरपि पवनः किंस्विदित्युन्मुखीभि-
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धाङ्गनाभिः ।
स्थानादस्मात् सरसनिचुलादुत्पतोदङमुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ।।

'गिरिशिखर हरी पवन काय तरी ?' शंकाकातर डोळे
उचलुनि अल्लड सिद्धवल्लभा तुझे पाहतिल चाळे
वेताटीचें डांग सोडुनी उड उत्तर देशांत
मार्गी चुकवित दिङ्नागांच्या सोंडांचे आघात.

१५

रत्नच्छायाव्यतिकर इव प्रेक्ष्यमेतत्पुरस्ता-
द्वल्मीकाग्रात्प्रभवति धनु:खण्डमाखण्डलस्य ।
येन श्यामं वपुरतितरां कान्तिमापत्स्यते ते
बर्हेणेव स्फुरितरुचिना गोपवेषस्य विष्णो: ।।

**समोर बघ वारुळामधूनी उठते इंद्रधनूची**
**फाक झगमगे जणूं मीनली मांदी नवरत्नांची**
**छबी सांवळी तुझी त्यामुळे दिसेल अधिकच गहिरी**
**उज्ज्वल मोरपिसानें जेवीं गोपरूप कंसारी**

१६

त्वय्यायत्तं कृषिफलमिति भ्रूविलासानभिज्ञै:
प्रीतिस्निग्धैर्जनपदवधूलोचनै: पीयमान: ।
सद्य:सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किंचित् पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।।

**सराइ तुझिया हातिं म्हणोनी लेकिसुना कर्ष्यांच्या**
**साठवतिल तुज प्रेमळ डोळीं भुवया भोळ्या ज्यांच्या**
**नांगरटीने नव्या सुगंधित मालवदेशी चढुन**
**पश्चिमेस वळ जरा झडकरी उत्तरेस जा फिरून**

१७

त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः ।
न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ।।

तुवां विझविला वणवा सरिनीं म्हणुनि आदरिल तुजला
शिरीं धरोनी आम्रकूट गिरि चालूनि तूं दमलेला
येतां दारीं मित्र स्मरोनी त्याचे गत उपकार
क्षुद्रहि विमुख न होत, मग कसे शैलासम जे थोर ?

१८

छन्नोपान्तः परिणतफलद्योतिभिः काननाम्रै-
स्त्वय्यारूढे शिखरमचलः स्निग्धवेणीसवर्णे ।
ननं यास्यत्यमरमिथुनप्रेक्षणीयामवस्थां
मध्ये श्यामः स्तन इव भुव शेषविस्तारपाण्डुः ।।

रायवळींना पाड लागतां आडी* पांढुर झाल्या
अशा गिरीच्या माथ्यावरतीं वास तुवां जर केला
कुंतल श्यामल तव रंगानें सुरमिथुनास गमेल
तो धरणीचा स्तनसा मध्यें श्याम सभोतीं गौर

*आडी – डोंगरांचे उतार, आडवे.

१९

स्थित्वा तस्मिन् वनचरवधुभुक्तकुन्जे मुहूर्तुं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ।
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ।।

क्षण थांबावें कुंजी जेथें तरुण भिल्लिणी रमती,
शिपुनि पाणी हलक्या अंगें शीघ्र चाल तूं पुढतीं,
विंध्याद्रीच्या खडक पायथ्यावर फुटली रेवेची
पहा धार कीं गजदेहावर रंगावलि वेलींची

२०

तस्यास्तिक्तैर्वनगजमदैर्वासितं वान्तवृष्टि-
र्जम्बूकुञ्जप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः ।
अन्तःसारं घन तुलयितुं नानिलः शक्ष्यति त्वां
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ।।

पाउस ओकुन हल्लक पोटीं रेवाजल रिचवावे,
वन्य गज मदें गंधित होऊनि जांभुळवनिं जें ठेलें
अंगीं भरशिल, उडविल तुज मग कैसा वारा सखया ?
अवमानिति जो रिता तयातें भरल्या मान जगीं या

२१

नीपं दृष्ट्वा हरितकपिशं केसरैरर्धरूढै-
रार्विर्भूतप्रथममुकुल: कन्दलीश्चानुकच्छम् ।
दग्धारण्येष्वधिकसुरभिं गन्धमाघ्राय चोर्व्याः
सारङ्गास्ते नवजलमुचः सूचयिष्यन्ति मार्गम् ॥

अर्थ - उमलल्या नीव फुलांचे केसर पिंगट हिरवे,
ओलवटीवर चविणी - कांदे नव्या सुया फुटलेले
जळल्या रानामधल्या भुईचा हुंगून गंध खमंग
सुचवतील मृग नव्या सरींनीं तुवां शिपिला मार्ग.

२२

उत्पश्यामि द्रुतमपि सखे मत्प्रियार्थं यियासोः
कालक्षेपं ककुभसुरभौ पर्वते पर्वते ते ।
शुक्लापाङ्गैः सजलनयनैः स्वागतीकृत्य केकाः
प्रत्युद्यातः कथमपि भवान् गन्तुमाशु व्यवस्येत् ॥

गिरी गिरीवरि ऐन - फुलोरे, केकावलि मयुरांची
स्वागतार्थ तव, सजल तयांच्या शुभ्र कोर डोळ्यांची,
मत्कार्याची तुजसी घाई परि आशंका मजला
गुंतून पडशिल, कसेंहि करूनि बघ निघण्याचें सखया

२३

पाण्डुच्छायोपवनवृतयः केतकैः सूचिभिन्नै-
नीडारम्भैर्गृहबलिभुजामाकुलग्रामचैत्याः ।
त्वय्यासन्ने परिणतफलश्यामजम्बूवनान्ताः।
संपत्स्यन्ते कतिपयदिनस्थायिहंसा दशार्णाः ॥

केतक - कणसें उलुन कुंपणें पांढुरकीं बागांची.
ग्रामतरुंवर घरटीं रचित्या कलकल काकादींची
पिकुनि जांभळे राया काळ्या तेथें वसतिल हंस
अल्पकाळ, तूं पोचशील जों दशार्णाख्य देशास

२४

तेषां दिक्षु प्रथितविदिशालक्षणां राजधानीं
गत्वा सद्य फलमविकलं कामुकत्वस्य लब्धा ।
तीरोपान्तस्तनितसुभगं पास्यसि स्वादु यस्मात्
सभ्रूभङ्गं मुखमिव पयो वेत्रवत्याश्चलोर्मि ॥

त्याचें प्रसिद्ध पट्टण विदिशा तेथें होईल प्राप्त
पोचतांच तुज कामिजनां जें गमे सारसर्वस्व
कंठीं-तीरीं सुस्वर मर्मर चंचल भुवया - लहरी
वेत्रवती जल - अधर मधुर तूं चुंबी सरिता नारी.

२५

नीचैराख्यं गिरिमधिवसेस्तत्र विश्रामहेतो-
स्त्वत्संपर्कात् पुलकितमिव प्रौढपुष्पैः कदम्बैः ।
यः पण्यस्त्रीरतिपरिमलोद्गारिभिर्नागराणा-
मुद्दामानि प्रथयति शिलावेश्मभियौवनानि ॥

तुझिया स्पर्शे रोमांचित हो टपोर नीप फुलांनी
नीचैर्गिरि मग, तिथें थांब तूं थकतां वाट-श्रमांनी
गुहांगुहांतून गणिकांसंगे विहरति नागर तरुण
तेथ दरवळे भोगगंध की मदोन्मत्त तारुण्य

२६

विश्रान्तः सन् व्रज नगनदीतीरजातानि सिञ्च-
न्नुद्यानानां नवजलकणैर्यूथिकाजालकानि ।
गण्डस्वेदापनयनरुजाक्लान्तकर्णोत्पलानां
छायादानात् क्षणपरिचितः पुष्पलावीमुखानाम् ॥

शीण उतरतां नगनदितीरीं मळींतल्या बागांत
जुई - कळ्यांना नव्या सरींनीं जाइ घना शिंपीत
घाम गालिचा पुसून बावल्या कर्णकमलिनी ज्यांच्या
छायाकरितां लगटुनि क्षण जा मुखास माळीणींच्या.

२७

वक्रः पन्था यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशां
सौधोत्सङ्गप्रणयविमुखो मा स्म भूरुज्जयिन्याः ।
विद्युद्दामस्फुरितचकितैस्तत्र पौराङ्गनानां
लोलापाङ्गैर्यदि न रमसे लोचनैर्वञ्चितोऽसि ॥

**वाट वाकडी अवश्य करि तूं उत्तरेस जातांना**
**नकोस चुकवूं उज्जैनीच्या बिलगाया सौधांना**
**वीज चमकतां बावरलेल्या रमणींच्या भिरभिरत्या**
**कटाक्षीं जरी हरखशील ना व्यर्थ जिणें तव मित्रा.**

२८

वीचिक्षोभस्तनितविहगश्रेणिकाञ्चीगुणायाः
संसर्पन्त्याः स्खलितसुभगं दर्शितावर्तनाभेः ।
निर्विन्ध्यायाः पथि भव रसाभ्यन्तरः सन्निपत्य
स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु ॥

**तरंग उठता विहंगमतती, बोले ती जिस कांची**
**थबकत मुरकत चाले दावी नाभी आवर्ताची,**
**निर्विध्येला अशा गांठुनी मार्गी रस घे लुटुन**
**नखरे हे तर प्रियास पहिली स्त्री प्रेमाची खूण**

२९

वेणीभूतप्रतनुसलिला तामतीतस्य सिन्धुः
  पाण्डुच्छाया तटरुहतरुभ्रंशिभिर्जीर्णपर्णैः ।
सौभाग्यं ते सुभग विरहावस्थया व्यञ्जयन्ती
  कार्श्यं येन त्यजति विधिना स त्वयैवोपपाद्यः ॥

दा. क्र. १८०८९

तिला लंघिता दिसेल सिन्धू विरहें कृश झालेली
  वेणीच्या पेडासम धारा, फिकटपणा आलेली,
तटिच्या पानगळीनें ती तर दावि तुझें सौभाग्य,
  म्हणून कृशता जाईल तिची असें करावें कार्य.

३०

प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्
  पूर्वोद्दिष्टामनुसर पुरीं श्रीविशालां विशालाम् ।
स्वल्पीभूते सुचरितफले स्वर्गिणां गां गतानां
  शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत् खण्डमेकम् ॥

गाव-वृद्ध ज्या अवंति देशीं उदयनकथा - रसज्ञ
  पूर्वी कथिल्या उज्जयिनीला जा जी धनसंपन्न
सरतां सुकृत उरल्या पुण्यें जणू आणिलें खालीं
  लखलखणारें स्वर्गखंड भूवरती स्वर्गस्थांनीं.

३१

दीर्घीकुर्वन् पटु मदकलं कूजितं सारसानां
प्रत्यूषेषु स्फुटितकमलामोदमैत्रीकषायः ।
यत्र स्त्रीणां हरति सुरतग्लानिमङ्गानुकूलः
शिप्रावातः प्रियतम इव प्रार्थनाचाटुकारः ।।

मस्त टिपेची सारसावाणी नेतो वाहुन दूर,
प्रभात काळीं प्रफुल्ल कमलां भेटुनि गंध विभोर,
शिप्रा - वारा अंग - सुखविता कुरवाळी हरि थकवा,
सुरते शिणल्या नारींचा करि साजण लाडिगुडी वा

३२

जालोद्गीर्णैरुपचितवपुः केशसंस्कारधूपै-
र्बन्धुप्रीत्या भवनशिखिभिर्दत्तनृत्योपहारः ।
हर्म्येष्वस्याः कुसुमसुरभिष्वध्वखेदं नयेथा
लक्ष्मीं पश्यँल्ललितवनितापादरागाङ्कितेषु ।।

केस - धूप जाळींतुन वर ये तो तुज पुष्ट करील,
बंधुप्रेमें स्वागत करतिल नाचुन पाळिव मोर,
ललनांच्या पदरंगें रंगति, परिमळती पुष्पांनीं,
ऐशा सदनीं शीण घालवी वैभव तें देखोनी

३३

भर्तुः कण्ठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः
पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धाम चण्डीश्वरस्य ।
धूतोद्यानं कुवलयरजोगन्धिभिर्गन्धवत्या-
स्तोयक्रीडानिरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥

शिवकंठासम निळच्या तव छटा शिवगण सादर बघती,
त्रिभुवनपतिच्या पुण्य मंदिरीं जातां रम्य प्रभातीं
कमल-सौरभें, जळीं डुंबत्या प्रमदांच्या उटण्यानें
गंधवतीच्या गंधित झुळुका डुलवतील उद्यानें.

३४

अप्यन्यस्मिन्जलधर महाकालमासाद्य काले
स्थातव्यं ते नयनविषयं यावदत्येति भानुः ।
कुर्वन् संध्यावलिपटहतां शूलिनः श्लाघनीया-
मामन्द्राणां फलमविकलं लप्स्यसे गर्जितानाम् ॥

महाकाळ - मंदिरीं पोचशील जरि वेळीं तूं अन्य
थांब, जोंवरी नयनपथांतुनि भानु न जात निघून
सांजवातिच्या समयि शंभुच्या निनादवी तव भेरी
पुरेपूर मग शिवसेवेचें पडेल फळ तव पदरीं.

३५

पादन्यासैः क्वणितरशनास्तत्र लीलावधूतै
    रत्नच्छायाखचितवलिभिश्चामरैः क्लान्तहस्ताः ।
वेश्यास्त्वत्तो नखपदसुखान् प्राप्य वर्षाग्रबिन्दु-
    नामोक्ष्यन्ते त्वयि मधुकरश्रेणिदीर्घान् कटाक्षान् ।।

तिथें नाचतां वेश्या थक् थय त्यांच्या झणणति रशना,
    रत्नजडित दांड्यांच्या चवऱ्या ढळतां शिण हातांना,
नखव्रणांचा दाह शांतवित पडतां नव नव थेंब
    फेकतील तुजवरी कटाक्षा अलिमाला जणुं लांब.

३६

पश्चादुच्चैर्भुजतरुवनं मडलेनाभिलीनः
    सान्ध्यं तेजः प्रतिनवजपापुष्परक्तं दधानः ।
नृत्यारम्भे हर पशुपतेरार्द्रनागाजिनेच्छां ।
    शान्तोद्वेगस्तिमितनयनं दृष्टभक्तिर्भवान्या ।।

संध्यारंगें जास्वदींच्या नव पुष्पासम रक्त
    होऊन, वेढी उंच तरुसम शुभंकराचे हस्त
हरशिल तूं जर आवड त्याची ओल्या गजचर्माची
    नृत्यारंभी बघेल गौरी आनंदोनी तुजशीं.

३७

गच्छन्तीनां रमणवसतिं योषितां तत्र नक्तं
  रुद्धालोके नरपतिपथे सूचिभेद्यैस्तमोभिः ।
सौदामिन्या कनकनिकषस्निग्धया दर्शयोर्वीं
  तोयोत्सर्गस्तनितमुखरो मा स्म भूर्विक्लवास्ताः ॥

तेथे रात्रीं प्रियकरसदना जाणाऱ्या रमणींची
  राजपथीं तिमिराच्या लेपें दृष्टी कुंठित साची
निकषीं कांचनरेघा तैशा वाट विजांनी दावी
  वर्षुं नको की गर्जुं नको, त्या कातर जरि अभिसारी.

३८

तां कस्याञ्चिद्भवनवलभौ सुप्तपारावतायां
  नीत्वा रात्रिं चिरविलसनात्खिन्नविद्युत्कलत्रः ।
दृष्टे सूर्ये पुनरपि भवान् वाहयेदध्वशेषं
  मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः ॥

वीज - सखी लवलवुनी शिणली म्हणून काढी रात्र
  कुठें घराच्या वळचणीस तूं निजत पारवे जेथ
गोंडा फुटता परि प्रिय सखया लाग पुन्हा मार्गास
  आळस नेणति पत्करती जे सुहृदांच्या कार्यास.

३९

तस्मिन् काले नयनसलिलं योषितां खण्डितानां
शान्तिं नेयं प्रणयिभिरतो वर्त्म भानोस्त्यजाशु ।
प्रालेयास्त्रं कमलवदनात् सोऽपि हर्तुं नलिन्याः
प्रत्यावृत्तस्त्वयि कररुधि स्यादनल्पाभ्यसूयः ॥

फसव्या पतिंनीं ज्यांस वंचिलें त्या रमणींचे आंसूं
पुसण्याची ती वेळा म्हणुनी रविमार्गा सोडी तूं
दवाश्रु कमलिनि-वदनावरचे तोहि येत टिपण्यास
कर त्याचे अडवितां तुजवरी करील अति कोपास.

४०

गम्भीरायाः पयसि सरितश्चेतसीव प्रसन्ने
छायात्मापि प्रकृतिसुभगो लप्स्यते ते प्रवेशम् ।
तस्मादस्याः कुमुदविशदान्यर्हसि त्वं न धैर्या-
न्मोघीकर्तुं चटुलशफरोद्वर्तनप्रेक्षितानि ॥

प्रांजळ हृदयासमान निर्मळ जळांत गंभीरेच्या
प्रवेश होइल सहज सुंदरा तव छाया मूर्तीचा
कुमुदा ऐसे धवल, चपल जे मासोळ्यासम उडत्या
कटाक्ष विफल न करी तियेचे औद्धत्यानें तुझिया.

४१

तस्याः किञ्चित्करधृतमिव प्राप्तवानीरशाखं
नीत्वा नीलं सलिलवसनं मुक्तरोधोनितम्बम्
प्रस्थानं ते कथमपि सखे लम्बमानस्य भावि
ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ॥

वेताटीच्या हातांनीं जें कसेंबसें सावरलें
वस्त्रजलाचें तिचें फेडुनी नीर नितंबावरलें
रमणारच तूं तिथें, तेथुनी कसा निघावा पाय ?
नार अनावृत्त तशीच सोडिल कुणी अनुभवी काय ?

४२

त्वन्निष्यन्दोच्छ्वसितवसुधागन्धसंपर्करम्यः
स्त्रोतोरन्ध्रध्वनितसुभगं दन्तिभिः पीयमानः ।
नीचैर्वास्यत्युपजिगमिषोर्देवपूर्वं गिरिं ते
शीतो वायुः परिणमयिता काननोदुम्बराणाम् ॥

वृष्टीनें तव भूमि वाफसे, गंधें भरला वारा
सोंडा उभवुनि पितील हत्ती करुनी मधु सीत्कारा.
रानउंबरें पिकवित झुळझुळ तो शीतळ वाहील
देवगिरिकडे निघशील तेंव्हा तुज वाहन होईल.

४३

तत्र स्कन्दं नियतवसतिं पुष्पमेघीकृतात्मा
पुष्पासारैः स्नपयतु भवान् व्योमगङ्गाजलार्द्रैः ।
रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूना-
मत्यादित्यं हुतवहमुखे संभृतं तद्धि तेजः ।।

सुरेन्द्र सेना रक्षाया स्तव शशिशेखर शंभूनें
सूर्याहूनी प्रखर तेज जें अग्निमुखीं ठेवियलें,
तेथ तें वसे स्कंद म्हणोनी त्यातें घाली स्नान
स्वर्गंगेच्या फुलधारासम पुष्पमेघ होऊन.

४४

ज्योतिर्लेखावलयि गलितं यस्य बर्हं भवानी
पुत्रप्रेम्णा कुवलयदलप्रापि कर्णे करोति ।
धौतापाङ्गं हरशशिरुचा पावकेस्तं मयूरं
पश्चादद्रिग्रहणगुरुभिर्गर्जितैर्नर्तयेथाः ।।

रंगलहरतें पिस मोराचें त्याच्या गळतां गौरी
पुत्रप्रेमें कानीं ठेवी कमलदला अव्हेरी.
कड डोळ्यांची ज्याच्या चमके शिवेंदुच्या किरणांत
नाचव मयुरा करुनि गर्जना घुमवित थोर गुहांत.

४५

आराध्यैवं शरवणभवं देवमुल्लङ्घिताध्वा
सिद्धद्वन्द्वैर्जलकणभयाद्वीणिभिर्मुक्तमार्गः ।
व्यालम्बेथाः सुरभितनयालम्भजां मानयिष्यन्
स्त्रोतोमूर्त्या भुवि परिणतां रन्तिदेवस्य कीर्तिम् ।।

शरवनिं जन्मे त्या स्कंदातें पुजुनी निघतां, वाट
देतिल वीणा भिजतिल म्हणुनी सिद्ध-जोडपीं भीत.
गोयज्ञामधिं उगम जिचा ती रंतिदेव राजाची
कीर्तिच चंबळ भूवर वाहे थांब वंद्य तुज साची.

४६

त्वय्यादातुं जलमवनते शार्ङ्गिणो वर्णचौरे
तस्याः सिन्धोः पृथुमपि तनुं दूरभावात् प्रवाहम् ।
प्रेक्षिष्यन्ते गगनगतयो नूनमावर्ज्य दृष्टी-
रेकं मुक्तागुणमिव भुवः स्थूलमध्येन्द्रनीलम् ।।

रंगचोर तूं विष्णूचा जधिं वाकशील जल प्याया
सरितेवरती, रुंद असुनिहि दुरून कृश दिसणाऱ्या.
नभिच्या पांथा खालीं दृष्टी वळतां क्षणि भासेल
भूरमणीचा सर मोत्यांचा मध्ये नीळ टपोर.

४७

तामुत्तीर्य व्रज परिचितभ्रूलताविभ्रमाणां
पक्ष्मोत्क्षेपादुपरिविलसत्कृष्णशारप्रभाणाम् ।
कुन्दक्षेपानुगमधुकरश्रीमुषामात्मबिम्बं
पात्रीकुर्वन् दशपुरवधूनेत्रकौतूहलानाम् ॥

पार करी तिज मग होशिल तूं विषय नेत्र-कुतुकाचा
भुवया-नर्तन ठाऊक ऐशा दशपुरवासि स्त्रियांच्या
उठतां ज्यांच्या वरी पापण्या चमकति डोळे काळे
कुंदफुलांच्या डोलासंगें जणूं भ्रमरहि डोले.

४८

ब्रह्मावर्तं जनपदमथ च्छायया गाहमानः
क्षेत्रं क्षत्रप्रधनपिशुनं कौरवं तद्भजेथाः ।
राजन्यानां शितशरशतैर्यत्र गाण्डीवधन्वा
धारापातैस्त्वमिव कमलान्यभ्यवर्षन्मुखानि ॥

जनपद ब्रह्मावर्तावरुनी सरकूं दे तव छाया
क्षत्रिय भिडले मिटले ऐशा कुरुक्षेत्रिं निघ जाया.
जेथें पार्थें खरशर वर्षुनि विंधिलि राजन्यांचीं,
शिरें, झडीनीं झोडपशी तूं दलें जशी कमळांचीं

४९

हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनाङ्कां
बन्धुप्रीत्या समरविमुखो लाङ्गली याः सिषेवे ।
कृत्वा तासामभिगममपां सौम्य सारस्वतीना-
मन्तःशुद्धस्त्वमपि भविता वर्णमात्रेण कृष्णः ॥

नयन बिंबले रेवतिचे त्या प्रिय मदिरेते त्यजुनी
कुळक्षयकरी युद्धा त्यजुनी, सरस्वतीचें पाणी
बळरामें जें सेवियलें तें पिऊन होशिल विमल
अन्तर्यामीं, श्यामल जरि वरि वर्ण तुझा राहील

५०

तस्माद्गच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णां
जह्नोः कन्यां सगरतंनयस्वर्गसोपानपङ्क्तिम् ।
गौरीवक्त्रभ्रुकुटिरचनां या विहस्येव फेनैः
शंभो केशग्रहणमकरोदिन्दुलग्नोर्मिहस्ता ॥

तेथुन जा कनखला जान्हवी जिथें उतरते खालीं
हिमवंतांतुन, सगरसुतांसी स्वर्ग शिडी जणुं झाली.
मोडी भुवया गौरी तरी जी तिज फेसाळत हंसते
चंद्रा भिडुनी लहरिकरांनीं शंभुजटा विस्कटते.

५१

तस्याः पातुं सुरगज इव व्योम्नि पश्चार्धलम्बी
त्वं चेदच्छस्फटिकविशदं तर्कयेस्तिर्यगम्भः ।
संसर्पन्त्या सपदि भवतः स्रोतसि च्छाययासौ
स्यादस्थानोपगतयमुनासङ्गमेवाभिरामा ।।

तिरकें वाकुनि नभीं दिग्गजासमान पिउ बघशील
स्पटिक शुभ्र जळ जान्हविचें ज्या क्षणीं तदा होईल
तिच्या प्रवाहीं तुझी सरकती छाया बिंबुनी भास
यमुना संगम रम्य होतसे जणुं भलत्या स्थानास

५२

आसीनानां सुरभितशिलं नाभिगन्धैर्मृगाणां
तस्या एव प्रभवमचलं प्राप्य गौरं तुषारैः ।
वक्ष्यस्यध्वश्रमविनयने तस्य शृङ्गे निषण्णः
शोभां शुभ्रत्रिनयनवृषोत्खातपङ्कोपमेयाम् ।।

हिमें धवल जो त्या शैला जा, तिचा जेथ हो उगम
सुरभित जेथिल शिळा कस्तुरी-मृग बसल्यानें, शीण
घालाव त्याच्या शिरीं विसावुन, दिसेल त्याक्षणि मेघा
धवल नंदीच्या खुरें उकरल्या चिखलासम तव शोभा.

... ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
मेघदूत ३५.६५९. वि: ...३३ ०५।०५.
दर्जांक ...१५०९० नोंद दि: ...३।३।६२



तं चेद्वायौ सरति सरलस्कन्धसंघट्टजन्मा
बाधेतोल्काक्षपितचमरीबालभारो दवाग्निः ।
अर्हस्येनं शमयितुमलं वारिधारासहस्रै-
रापन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् ।।

वारा सुटतां देवदारुच्या फांद्या घासून वणवा,
छळील गिरिला जरि ठिणग्यांनीं चमरि–केस जाळुनियां.
झडी वर झडी वर्षुन पुरतें विझवुनि त्या टाकावें
सुजनांचें धन दीनदुःख हरि तरीच सार्थक पावें.

*५५

तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौलेः
शश्वत् सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्रः परीयाः ।
यस्मिन् दृष्टे करणविगमादूर्ध्वमुद्धूतपापाः
संकल्पन्ते स्थिरगणपदप्राप्तये श्रद्दधानाः ।।

पाषाणीं जे चंद्रमौलिचे चरण उमटले त्यातें
प्रदक्षिणा घालुन वंदावे, पूज्य सदा सिद्धातें.
दर्शन त्यांचें जाळी पापें भक्तांची, देहान्तीं
करुन घेति ते शंभुगणांच्या अढळपदाची प्राप्ति

*५४ वा श्लोक गाळला आहे.

५६

शब्दायन्ते मधुरमनिलैः कीचकाः पूर्यमाणाः
संसक्तभिस्त्रिपुरविजयो गीयते किन्नरीभिः ।
निर्ह्रादस्ते मुरज इव चेत् कन्दरेषु ध्वनिः स्यात्
संगीतार्थो ननु पशुपतेस्तत्र भावी समग्रः ।।

वारा भरल्या वेणुवनांतुन मधुर सूर घुमतील
त्रिपुरजयातें किन्नरकन्या एकमेळि गातील.
गुहागुहांतुन मृदंगापरी तव जरि घोष घुमेल
साज शिवाच्या संगीताचा साच पूर्ण होईल.

५७

प्रालेयाद्रेरुपतटमतिक्रम्य तांस्तान् विशेषान्
हंसद्वारं भृगुपतियशोवर्त्म यत् क्रौञ्चरन्ध्रम् ।
तेनोदीचीं दिशमनुसरेस्तिर्यगायामशोभी
श्यामः पादो बलिनियमनाभ्युद्यतस्येव विष्णोः ।।

हिमशैलाच्या कुशींत नाना विशेष, पार करी ते
*खगा मार्ग दे क्रौंचरंध्र जें भार्गवयश मिरवीतें.
त्यांतुन तिरपा पसरुन जातां उत्तरेस तूं छान
दिसशिल जणुं हरि बलिदमनास्तव उचली श्यामल चरण.

* मुळांत हंस शब्द आहे. पण क्रौंच रंध्रामधून उत्तरेला हंसच जात नसत हें क्रौंचरंध्र ह्या नांवावरूनहि लक्षांत येईल.

५८

गत्वा चोर्ध्वं दशमुखभुजोच्छ्वासितप्रस्थसंधेः
कैलासस्य त्रिदशवनितादर्पणस्यातिथिः स्याः ।
शृङ्गोच्छ्रायैः कुमुदविशदैर्यो वितत्य स्थितः खं
राशीभूतः प्रतिदिनमिव त्र्यम्बकस्याट्टहासः ।।

रावण निखळी सांधे ज्याचे, जो हो सुरांगनांचा
ऐना, त्यावर चढुनि पाहुणा बन कैलासगिरीचा
कुमुद-धवलशीं नभीं पसरलीं भासत शिखरें त्याचीं
प्रतिदिनिं जमवुनि रचिलि हराच्या रास अट्ट-हास्याची.

५९

उत्पश्यामि त्वयि तटगते स्निग्धभिन्नाञ्जनाभे
सद्यःकृत्तद्विरददशनच्छेदगौरस्य तस्य ।
शोभामद्रेः स्तिमितनयनप्रेक्षणीयां भवित्री-
मंसन्यस्ते सति हलभृतो मेचके वाससीव ।।

नव्या कापिल्या गजदंतासम गौर गिरीच्या निकटीं
जातां खलल्या काजळापरी तुकतुकेल तव कान्ती
टक लावावी ऐसे दर्शन मग हो दिव्य सुरम्य
खांदी काळी कांबळ घेऊन उभा जणूं बळिराम.

६०

हित्वा तस्मिन् भुजगवलयं शंभुना दत्तहस्ता
क्रीडाशैले यदि च विहरेत् पादचारेण गौरी ।
भङ्गीभक्त्या विरचितवपुः स्तम्भितान्तर्जलौघः
सोपानत्वं कुरु मणितटारोहणायाग्रयायी ॥

सर्प–कंकणा टाकुनि शिव दे हात जिला ती गौरी
विहरत असली जर कां पायीं तेथें क्रीडाशैली
निज देहांतिल जलौघ गोठव, सरुन पुढें दे रचुन
संगमरवरी सौधावर तिज चढण्यास्तव सोपान.

६१

तत्रावश्यं वलयकुलिशोद्धट्टनोद्गीर्णतोयं
नेष्यन्ति त्वां सुरयुवतयो यंत्रधारागृहत्वम् ।
ताभ्यो मोक्षस्तव यदि सखे घर्मलब्धस्य न स्यात्
क्रीडालोलाः श्रवणपरुषैर्गर्जितैर्भाययेस्ताः ॥

तेथें खासच कंकणरत्नें टोचुनिया सुरयुवती
स्नानफवारा तुझा बनवतिल, मिळतां तूं ग्रीष्मान्तीं.
तावडींतुनी त्यांच्या सुटका जरी तुझी ना होई
खेळ मांडितिल तुजशी जरि त्यां कठोर गर्जुन भिववी.

६२

हेमाम्भोजप्रसवि सलिलं मानसस्याददानः
कुर्वन् कामं क्षणमुखपटप्रीतिमैरावतस्य ।
धुन्वन् कल्पद्रुमकिसलयान्यंशुकानीव वातै-
र्नानाचेष्टैर्जलद ललितैर्निर्विशेस्तं नगेन्द्रम् ।।

सोन-कमळिणी फुलती ऐसें मानसजळ सेवावें
मस्तकिचें क्षण वस्त्र बनोनी इंद्रगजां सुखवावें,
कल्पतरूंचे रेशिम-पल्लव झुळुकांनीं झुलवावे,
गिरिराजावरि नाना लाडिक क्रीडा करित रमावें.

६३

तस्योत्सङ्गे प्रणयिन इव स्रस्तगङ्गादुकूलां ।
न त्वं दृष्ट्वा न पुनरलकां ज्ञास्यसे कामचारिन् ।
या वः काले वहति सलिलोद्गारमुच्चैर्विमाना
मुक्ताजालग्रथितमलकं कामिनीवाभ्रवृन्दम् ।।

गंगा-शालू जिचा मांडिवर गिरि-रमणाच्या गळला
स्वच्छंदी तूं तरी जाणशिल देखतांच अलकेला.
माडीवर माडीची नगरी जशी रमणि कचपाशीं
मौक्तिक-जाळी माळी तशि ती मेघमाळ जलवर्षी.

# मेघदूत

## उत्तर-मेघ

६४

विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः
संगीताय प्रहतमुरजाः स्निग्धगम्भीरघोषम् ।
अन्तस्तोयं मणिमयभुवस्तुङ्गमभ्रंलिहाग्राः
प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः ॥

तुझ्या सखीसम लचकति नारी, इंद्रधनूसम चित्रें
तव घोषासम गभीर घोषति मृदंग सहसंगीतें,
तूं जलमय तीं आरस्पानी, तूं तीं गगनस्पर्शी
जेथिल भवनें अशा गुणांनी ठरतीं तुल्य तुझ्याशीं

६५

हस्ते लीलाकमलमलके बालकुन्दानुविद्धं
नीता लोध्रप्रसवरजसा पाण्डुतामानने श्रीः ।
चूडापाशे नवकुरबकं चारु कर्णे शिरीषं
सीमन्ते च त्वदुपगमजं यत्र नीपं वधूनाम् ॥

हातीं फिरविति कमळ माळिती कुंदकळ्या केसांत
लोध्र फुलांतिल शुभ्र रजांनीं मुखास उज्वलतात,
कोरांटीची वेणी नाजुक शिरीष कानीं डुलतें
प्रमदा-भांगीं फूल कदंबी तव सांगाती ये, तें

६६

यत्रोन्मत्तभ्रमरमुखराः पादपा नित्यपुष्पा
हंसश्रेणीरचितरशना नित्यपद्मा नलिन्यः ।
केकोत्कण्ठा भवनशिखिनो नित्यभास्वत्कलापा
नित्यज्योत्स्नाः प्रतिहततमोवृत्तिरम्याः प्रदोषाः ।।

**नित्य फुलत तरु, ज्यावर गुंजारव मत्त भ्रमरांचा**
**नित्य फुलत पुष्करिणीं ज्यांच्या रशना हंस-ततींच्या,**
**मयुर दारिंचे केकति ज्यांचा झळके नित्य पिसारा**
**नित्य चांदण्या रात्रीं जेथें रम्य, तमा ना थारा.**

६७

आनन्दोत्थं नयनसलिलं यत्र नान्यैर्निमित्तै-
र्नान्यस्तापः कुसुमशरजादिष्टसंयोगसाध्यात्
नापन्यस्मात् प्रणयकलहाद्विप्रयोगोपपत्ति-
र्वित्तेशानां न च खलु वयो यौवनादन्यदस्ति ।।

**संगमरवरी सौधावर बघ तारे बिंबित होती**
**फुलें विकसती, तेथें घेउनि रमणींना सांगातीं,**
**यक्ष सेविती कल्पफुलांचें कामोद्दीपक मद्य**
**तुझ्या ध्वनीसम बोलति जेव्हां मंद्र गभीर मृदंग**

६८

यस्यां यक्षाः सितमणिमयान्येत्य हर्म्यस्थलानि
ज्योतिश्छायाकुसुमरचितान्युत्तमस्त्रीसहायाः ।
आसेवन्ते मधु रतिफलं कल्पवृक्षप्रसूतं
त्वद्गम्भीरध्वनिषु शनकैः पुष्करेष्वाहतेषु ।।

अश्रू केवळ आनंदाचे दुसरे ठाउक नसती
ताप फक्त मदनाच्या बाणें, प्रियसंगें जे निवती,
विरह मात्र जर लाडिक झगडे झाले प्रेमांतून
धनपति जे त्या खरेंच दुसरें वय न यौवनावीण.

६९

मन्दाकिन्याः सलिलशिशिरैः सेव्यमाना मरुद्भि-
र्मन्दाराणामनुतटरुहां छायया वारितोष्णाः ।
अन्वेष्टव्यैः कनकसिकतामुष्टिनिक्षेपगूढैः
संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थितायत्र कन्याः ।।

मंदाकिनिच्या तुषारशीतल झुळुका सुखविति ज्यांना
निववी ज्यातें तटीं वाढल्या मंदारांची छाया,
झुरती ज्यांच्यासाठीं देवहि त्या कामिनि रेतींत
रत्नें दडवुनि शोधायाचा खेळ खेळती नित्य

७०

निवीबन्धोच्छ्वसितशिथिलं यत्र बिम्बाधराणां
क्षौमं रागादनिभृतकरेष्वाक्षिपत्सु प्रियेषु ।
अर्चिस्तुङ्गामभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान्
ह्रीमुढानां भवति विफलप्रेरणा चूर्णमुष्टिः ।।

गांठ निरीची सैलवलेले शालू बिंबौष्ठींचे
हिसकू बघती अधिरे प्रियकर उतावळ्या हातांचे,
रत्नदीप विझवण्या फेकिती गुलाल लाजुनि नारी
मुठिंनी, परि ते विझतिल कोठुनि ? खटपट वाया सारी

७१

नेत्रा नीताः सततगतिना यद्विमानाग्रभूमी-
रालेख्यानां नवजलकणैर्दोषमुत्पाद्य सद्यः ।
शङ्कास्पृष्टा इव जलमुचस्त्वादृशा जालमार्गै-
र्धूमोद्गारानुकृतिनिपुणा जर्जरा निष्पतन्ति ।।

भणभण वारा लोटित नेई तुजसम अन्य घनास
मेघडंबऱ्या मधि वाड्यांच्या, हानि तेथ चित्रांस,
जलकण लागुन होते बघतां बावरून अनुसरती
मार्ग धुराचा, विरळ बनोनी जाळ्यामधुनी पळती.

७२

यत्रस्त्रीणां प्रियतमभुजालिङ्गनोच्छ्वासिताना-
मङ्गग्लानिं सुरतजनितां तन्तुजालावलम्बाः ।
त्वत्संरोधापगमविशदैश्चन्द्रपादैर्निशीथे
व्यालुम्पन्ति स्फुटजललवस्यन्दिनश्चन्द्रकान्ताः ।।

प्रियकर-मिठितुन सुटल्या शिणल्या सुरतें त्या ललनांचा
मध्यरात्रिला हरतो थकवा पाझर चंद्रमण्यांचा,
जे गुंफियले छतझालरिना झरू लागतिल मित्रा
सरुनि दूर तूं निरभ्र शशिकर त्यांना कुरवाळीतां.

७३

अक्षय्यान्तर्भवननिधयः प्रत्यहं रक्तकण्ठै-
रुद्गायद्भिर्धनपतियशः किन्नरैर्यत्र सार्धम् ।
वैभ्राजाख्यं विबुधवनितावारमुख्यासहाया
बद्धालापा बहिरुपवनं कामिनो निर्विशन्ति ।।

कधीं न संपे असें घरीं धन, सुस्वर किन्नर गाती
धनपति-महिमा प्रतिदिनि जेथें, सुरगणिका सांगाती,
घेउन बसती नगरोद्यानीं जया नांव वैभ्राज
यक्ष रसीले विहरति, गप्पा मारिति लफ्फेबाज

७४

गत्युत्कम्पादलकपतितैर्यत्र मन्दारपुष्पैः
पत्रच्छेदैः कनककमलैः कर्णविभ्रंशिभिश्च ।
मुक्ताजालैः स्तनपरिसरच्छिन्नसूत्रैश्च हारै-
र्नैशो मार्गः सवितुरुदये सूच्यते कामिनीनाम् ।।

लगबग जातां मंदार फुलें वेणींतुन ढळलेलीं
कानीं सुवर्णकमळें त्यांची दळें जेथ गळलेलीं,
तुटल्या बिंदी, गेंद्रा घासुन काचुन गेले हार
सूर्योदयिं सुचविती रात्रिचा येथुन हो अभिसार

७५

मत्वा देवं धनपतिसखं यत्र साक्षाद्वसन्तं
प्रायश्चापं न वहति भयान्मन्मथः षट्पदज्यम् ।
सभ्रूभङ्गप्रहितनयनैः कामिलक्ष्येष्वमोघै-
स्तस्यारम्भश्चतुरवनिताविभ्रमैरेव सिद्धः ।।

धनदसखा शिव वसतो साक्षात् अलकेमधि जाणून
भ्रमरदोरिचें भयें नुचलि करिं बहुधा धनुष्य मदन,
चतुर कामिनी कार्यसाधिती परि त्याचें नखऱ्यांनीं
भुवया ताणुन लक्ष्य विंधिती आमोघ नयनशरांनीं

७६

वासश्चित्रं मधु नयनयोर्विभ्रमादेशदक्षं
पुष्पोद्भेदं सह किसलयैर्भूषणानां विकल्पान् ।
लाक्षारागं चरणकमलन्यासयोग्यं च यस्या-
मेकः सूते सकलमबलामण्डनं कल्पवृक्षः ।।

नवलाईचीं वसनें, मधु जी नेत्रीं चाळे प्रेरी
सपर्ण पुष्पें, कळ्या, भूषणें नाना चेतोहारी,
लाखरंग जर नाजुक चरणां रंगवण्यास हवेत
सर्व कल्पतरु एकटाच दे रमणीतें अलकेंत

७७

पत्रश्यामा दिनकरहयस्पर्धिनो यत्र वाहाः
शैलोदग्रास्त्वमिव करिणो वृष्टिमन्तः प्रभेदात् ।
योधाग्रण्यः प्रतिदशमुखं संयुगे तस्थिवांसः
प्रत्यादिष्टाभरणरुचयश्चंद्रहासव्रणांकैः ।।

पैजा घेती पर्ण-सावळे घोडे रवि-अश्वांशीं
नगप्राय गज स्त्रवती मद तूं जैसा पर्जन्यासी,
तेथिल गाढे वीर रावणा सवें रणीं झुजताती
चंद्रहासव्रण देहां भूषण-शोभेहुन भूषविती

७८

तत्रागारं धनपतिगृहानुत्तरेणास्मदीयं
दूराल्लक्ष्यं सुरपतिधनुश्चारुणा तोरणेन ।
यस्योपान्ते कृतकतनयः कान्तया वर्धितो मे
हस्तप्राप्यस्तवकनमितो बालमन्दारवृक्षः ।।

तेथें कुबेरवाडा त्याच्या उत्तरेस घर आमुचें
इंद्रधनूसम रम्य तोरणें दुरुन ओळखूं येतें,
दारीं विरडा* मंदाराचा पुत्रासम ज्या जपला
मम कान्तेने, हातपोचत्या बहरांनी जो लवला

७९

वापी चास्मिन् मरकतशिलाबद्धसोपानमार्गा
हैमैश्छन्ना विकचकमलैः स्निग्धवैदूर्यनालैः ।
यस्यास्तोये कृतवसतयो मानसं संनिकृष्टं
नाध्यास्यन्ति व्यपगतशुचस्त्वामपि प्रेक्ष्य हंसाः ।।

पुष्करणीला पाचुशिळांचा घाट, तिच्या पाण्यांत
सुवर्ण कमळें दाटत ज्यांना वैदूर्यांचे देठ,
तिथें विहरल्या हंसा ना ये सय जरि तुजला बघती
जवळींच्या मानसा जायची, तिथेंच वसती रमती

*विरडा–लहान वृक्ष

८०

तस्यास्तीरे रचितशिखरः पेशलैरिन्द्रनीलैः
क्रीडाशैलः कनककदलीवेष्टनप्रेक्षणीयः।
मद्गेहिन्याः प्रिय इति सखे चेतसा कातरेण
प्रेक्ष्योपान्तस्फुरिततडितं त्वां तमेव स्मरामि ।।

**तिचिया कांठीं क्रीडापर्वत नील मण्यांचें शिखर**
**सुंदर त्याचें, सोनकर्दळी करितो त्यास किनार,**
**आवडता कांतेचा त्याची, म्हणून आठव येते**
**मन बावरतें जधीं श्यामला वीज-कडें तव स्फुरतें.**

८१

रक्ताशोकश्चलकिसलयः केसरश्चात्र कान्तः
प्रत्यासन्नौ कुरवकवृतेर्माधवीमण्डपस्य ।
एकः सख्यास्तव सह मया वामपादाभिलाषी
काङ्क्षत्यन्यो वदनमदिरां दोहदच्छद्मनास्याः ।।

**अशोक पल्लव झुलत त्यावरी झाड छान बकुळीचें**
**माधविच्या मंडपा नजिक ज्या कुंपण कोरांटीचें,**
**एका लाहो माझिया परी सखिच्या वामपदाचा**
**बकुळीला डोहाळे म्हणुनी तिचिया मुखमदिरेचा**

८२

तन्मध्ये च स्फटिकफलका काञ्चनी वासयष्टि-
मूले बद्धा मणिभिरनतिप्रौढवंशप्रकाशैः ।
तालैः शिञ्जावलयसुभगैर्नर्तितः कान्तया मे
यामध्यास्ते दिवसविगमे नीलकण्ठः सुहृद्वः ।।

त्या वृक्षांमधिं स्फटिक फळ्यावर दांडी सोनीयाची
टोकें खिळविलीं रत्नें जडवुनि चिवारिच्या* रंगाची
नीलकंठ तव मित्र मोर सूर्यास्तीं बैसे तेथें
कंकणनादें मधुर टाळिवर कांता ज्या नाचविते.

८३

एभिः साधो हृदयनिहितैर्लक्षणैर्लक्षयेथा
द्वारोपान्ते लिखितवपुषौ शङ्खपद्मौ च दृष्ट्वा ।
क्षामच्छायं भवनमधुना मद्वियोगेन नूनं
सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामभिख्याम् ।।

ध्यानीं ठेव खुणा या शोधुन काढसख्या मम सदन
दारापाशीं रेखियलेलें शंखपद्म पाहून,
मालक नाहीं म्हणुनि बिचारें दिसत असेल उदास
सूर्य लोपतां खुलास शोभा यावि कशी कमळास ?

*चिवारी–बांबूचा एक प्रकार.

८४

गत्वा सद्यः कलभतनुतां शीघ्र संपातहेतोः
क्रीडाशैले प्रथमकथिते रम्यसानौ निषण्णः ।
अर्हस्यन्तर्भवनपतितां कर्तुमल्पाल्पभासं
खद्योतालीविलसितनिभां विद्युदुन्मेषदृष्टिम् ।।

**बाल-गजा एवढा होउनी उतर झडकरी खाली**
**मघाच कथिल्या शिखरीं सुंदर बैस क्रीडाशैलीं,**
**चमचम दृष्टी टाक विजेची आमुच्या भवनामाजी**
**जणूं काजवे लुकलुकताती वाटतील आकाशीं.**

८५

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिम्बाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः ।
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः ।।

**शेलाटी, सावळी, ओठ तर तोंडलेंच पिकलेलें**
**दांत कळ्यांसम, पातळ कंबर, कातर भेकर-डोळ,**
**संथ चालणें नितंबभारें स्तनभारें लव झुकली**
**नमुन्याची जणुं नार घडवली विधिनें पहिली वहिली**

८६

तां जानीथाः परिमितकथां जीवितं मे द्वितीयं
दूरीभूते मयि सहचरे चक्रवाकीमिवैकाम् ।
गाढोत्कण्ठा गुरुषु दिवसेष्वेषु गच्छत्सु वाला
जाता मन्ये शिशिरमथिता पद्मिनीवान्यरूपा ।।

मितभाषी ती मित्रा माझा आहे दुसरा प्राण
सखा दूर मी, ती एकाकी चक्रवाकिसम जाण
तळमळतें मन, दिवस न कंठति दशा तियेची झाली
हिमकुस्करली नलिनीच जशी कान्तारूपें ठेली

८७

नूनं तस्याः प्रबलरुदितोच्छूननेत्रं प्रियाया
निःश्वासानमशिशिरतया भिन्नवर्णाधरोष्टम् ।
हस्तन्यस्तं मुखमसकलव्यक्ति लम्बालकत्वा-
दिन्दोर्दैन्यं त्वदनुसरणक्लिष्टकान्तेर्बिभर्ति ।।

रडूरडुनिया डोळे सुजले, ओट ऊनशा स्वासें
करपुनि गेले, खालीं सुटल्या झाकियलें जें केसें,
तळहातीं टेकिलें सखिनें वदन न पुरतें दिसतें
तुवां झाकिल्या शशिबिम्बासम बापुडवाणें गमतें

८८

आलोके ते निपतति पुरा सा बलिव्याकुला वा
मत्सादृश्यं विरहतनु वा भावगम्यं लिखन्ती ।
पृच्छन्ती वा मधुरवचनां सारिकां पञ्जरस्थां
कच्चिद्भर्तुः स्मरहि रसिके त्वं हि तस्य प्रियेति ।।

दिसेल कान्ता बसलेली तुज पुजेंत लावुन चित्त
अथवा विरहकृश मज कल्पुन मजला रेखाटीत,
विचारीत वा पिंजऱ्यांतल्या मधुरबोल मैनेसी
आठवती मालक रसिके कां ? तूंच लाडकी त्यांची.

८९

उत्सङ्गे वा मलिनवसने सौम्य निक्षिप्य वीणां
मद्गोत्राङ्कं विरचितपदं गेयमुद्गातुकामा ।
तन्त्रीरार्द्रा नयनसलिलैः सारयित्वा कथञ्चिद्-
भूयो भूयः स्वयमपि कृतां मूर्च्छनां विस्मरन्ती ।।

मळकें लेउन, मांडीवरती वीणा घेउन बसते
गाया गाणें, ज्यांत गुंफिलें सखिनें मम नामातें,
पुसून काढी भिजल्या ताती कशा बशा अश्रूंनीं
स्वयें जुळविल्या तरी विसरते स्वर-माला फिरफिरनी

९०

शषान् मासान् विरहदिवसस्थापितस्यावधेर्वा
विन्यस्यन्ती भुवि गणनया देहलीदत्तपुष्पैः ।
मत्सङ्गं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती
प्रायेणैते रमणविरहेष्वङ्गनानां विनोदाः ॥

दा. क्र. ९४०६७

वियोग झाल्यापासुन मोजित उरले मास असेल,
प्रतिमासाते गणी डकवुन उंबरठ्यावर फूल,
मनीं कल्पिल्या मम संगाचें सुख वा घोळविते तो
काळ कंठण्या विरहीं बहुधा ही अबलांची रीती

९१

सव्यापारामहनि न तथा पीडयेन्मद्वियोगः
शङ्केरात्रौ गुरुतरशुचं निर्विनोदां सखीं ते ।
मत्संदेशैः सुखयितुमलं पश्य साध्वीं निशीथे
तामुन्निद्रामवनिशयनां सौधवातायनस्थः ॥

दिवसा कामामध्ये गुंते म्हणुनि वियोग न बोचे
रात्र मोकळी छळित वैरिणी परि तिज अतिशय जाचें,
भुइला अंथरुणीं तगमगते विरंगुळा दे सतिस
गच्चीच्या जाळींत बसोनी कथुनी मम संदेश

९२

आधिक्षामां विरहशयने संनिषण्णैकपार्श्वां
प्राचीमूले तनुमिव कलामात्रशेषां हिमांशोः।
नीता रात्रिः क्षण इव मया सार्धमिच्छारतैर्या
तामेवोष्णैर्विरहमहतीमश्रुभिर्यापयन्तीम् ।।

झुरणीने सुकलेली कुशिवर सुन्या शयनिं निजलेली
उमाठ्यावरी कीं चंद्राची क्षीण कोर कललेली,
मुक्तविलासीं माझ्या संगें रात्रीं संपत होत्या
क्षणासारख्या, त्या अजि कंठी दीर्घ अश्रुंनीं कढत्या

९३

पादानिन्दोरमृतशिशिराञ्जालमार्गप्रविष्टान्
पूर्वप्रीत्या गतमभिमुखं संनिवृत्तं तथैव ।
चक्षुः खेदात् सलिलगुरुभिः पक्ष्मभिश्छादयन्तीं
साभ्रेऽह्नीव स्थलकमलिनीं नप्रबुद्धां नसुप्ताम्

गवाक्षांतुनी सुधाशीतसे शशिकर सदनीं शिरती
सामोरी सवयीने जाई पाय परत परि वळती,
थबथबलीं जड नेत्रदळें तीं शोकें मिटुनी घेई
झाकळतां नभ नुमले न मिटे भुई कमळिणी जेवी

९४

नि:श्वासेनाधरकिसलयक्लेशिना विक्षिपन्तीं
    शुद्धस्नात् परुषमलकं नूनमागण्डलम्बम् ।
मत्संभोग: कथमुपनमेत् स्वप्नजोऽपीति निद्रा-
    माकाङ्क्षन्तीं नयनसलिलोत्पीडरुद्धावकाशाम् ।।

केस रूक्ष तेलाविण स्नानें गालावर भुरभुरती
    कोमल ओठा करपवणाऱ्या श्वासें दूर करी ती,
स्वप्नीं तरि हो मीलन म्हणुनी आळविते निद्रेला
    डबडबलें डोळ्यांमधि पाणी रोधि त्याहि मार्गाला

९५

आद्ये बद्धा विरहदिवसे या शिखा दाम हित्वा
    शापस्यान्ते विगलितशुचा तां मयोद्वेष्टनीयाम् ।
स्पर्शक्लिष्टामयमितनखेनासकृत् सारयन्तीं
    गण्डाभोगात् कठिनविषमामेकवेणीं करेण ।।

प्रथम दिनीं विरहाच्या वळली वळेसराविण* वेणी
    उकलायाची आहे मज ती शापमुक्त होवोनी,
राठ, गांठिची, एकच पेडी, वरच्यावर सावरिते
    गालावरुनी नखें वाढल्या बोटांनी, जी खुपते

*वळेसर—गजरा.

९६

सा संन्यस्ताभरणमबला पेशलं धारयन्ती
शय्योत्सङ्गे निहितमसकृद्दु:खदु:खेन गात्रम् ।
त्वामप्यस्त्रं नवजलमयं मोचयिष्यत्यवश्यं
प्राय: सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा ।।

आभरणें सांडिली तगवुनी धरी क्षीण कायेतें
शोकविव्हला शय्येवरि तळमळते, बसते, उठते
तव जलरूपी आंसू तुला ती ढाळाया लावील
अंतरिं ज्याच्या ओलावा तो असतो बहुधा सदय

९७

जाने सख्यास्तव मयि मन: संभृतस्नेहमस्मा-
दित्थंभूतां प्रथमविरहे तामहं तर्कयामि ।
वाचालं मां न खलु सुभगंमन्यभाव: करोति
प्रत्यक्षं ते निखिलमचिराद्भ्रातरुक्तं मया यत् ।।

ठावें मजसी तव भगिनीचा गाढ मजवरी प्रेमा
म्हणून पहिल्या विरही इतुकी खचली, करिं अनुमाना,
अवास्तव न हें मम भाग्याच्या ताठ्यानें सांगितलें
प्रत्यक्षचि तूं बघशिल लवकरि सगळें मीं जें कथिलें

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
मेघदूत वि: ५५
नों० दि०

९८

रुद्धापाङ्गप्रसरमलकैरञ्जनस्नेहशून्यं
प्रत्यादेशादपि च मधुनो विस्मृतभ्रूविलासम् ।
त्वय्यासन्ने नयनमुपरिस्पन्दि शङ्के मृगाक्ष्या
मीनक्षोभाच्चलकुवलयश्रीतुलामेष्यतीति ।।

केस अडविती कटाक्ष ज्यांचे, काजळ ज्यांतें न मिळे
मदिरा त्यजितां मोहक भुवया-नर्तन विसरुन गेले,
हरीण डोळे तव आगमनीं आनंदे फुलतील
मासोळ्या भोवत्या खेळत्या कमळासम दिसतील

९९

वामश्चास्याः कररुहपदैर्मुच्यमानो मदीयै-
र्मुक्ताजालं चिरपरिचितं त्याजितो दैवगत्या ।
संभोगान्ते मम समुचितो हस्तसंवाहनानां
यास्यत्यूरुः सरसकदलीस्तम्भगौरश्चलत्वम् ।।

जिच्यावरी ना नखव्रणांच्या खुणा उमटती माझ्या,
दुर्दैवें जी मुकलि सदाच्या मोतीयांच्या साजा,
सुरता नंतर जी निज हस्तें होतों नित्य चुरीत,
मांडी डावी, स्फुरेल गोरी केळखांब रसरशित

१००

तस्मिन् काले जलद यदि सा लब्धनिद्रासुखा स्या-
दन्वास्यैनां स्तनितविमुखो याममात्रं सहस्व ।
मा भूदस्याः प्रणयिनि मयि स्वप्नलब्धे कथञ्चित्
सद्यःकण्ठच्युतभुजलताग्रन्थि गाढोपगूढम् ।।

त्या समयीं जर सुखें झोपली असेल जलदा शान्त,
गर्जु नको तूं बैस जवळि बघ वाट प्रहरपर्यन्त,
प्रियकर मी तिज असेन स्वप्नीं कष्टें सापडलेला,
न हो क्षणिं ढिला पाश भुजांचा गळामिठी पडलेला

१०१

तामुत्थाप्य स्वजलकणिकाशीतलेनानिलेन
प्रत्याश्वस्तां सममभिनवैर्जालकैर्मालतीनाम् ।
विद्युद्गर्भः स्तिमितनयनां त्वत्सनाथे गवाक्षे
वक्तुं धीरः स्तनितवचनैर्मानिनीं प्रक्रमेथाः ।।

तिला जागवी स्वजल कणांहीं शीतलशा झुळुकांनी
मालतिच्या नवकळ्यां बरोबर तिला जाग आणोनी,
तूं बसलेल्या गवाक्षावरी नजर तिची खिळतांच
गंभीर अशा गर्जनशब्दें मानिनीस वद साच :

१०२

भर्तुर्मित्रं प्रियमविधवे विद्धि मामम्बुवाहं
तत्संदेशैर्हृदयनिहितैरागतं त्वत्समीपम् ।
यो वृन्दानि त्वरयति पथि श्राम्यतां प्रोषितानां
मन्द्रस्निग्धैर्ध्वनिभिरबलावेणिमोक्षोत्सुकानि ।।

" सखा मेघ मी तुझ्या पतीचा जिवलग सुभगे जाणी
आलों तुझिया समीप त्याचा निरोप हृदयीं धरुनी,
वेणि सोडण्या भार्यांची जे उत्सुक, परि पथिं दमती
त्या पांथांना गभीर प्रेमळ वच मम प्रोत्साहीती."

१०३

इत्याख्याते पवनतनयं मैथिलीवोन्मुखी सा
त्वामुत्कण्ठोच्छ्वसितहृदया वीक्ष्य संभाव्य चैव ।
श्रोष्यत्यस्मात् परमवहिता सौम्य सीमन्तिनीनां
कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किञ्चिदूनः ।।

ऐसें वदतां उत्कंठेनें हृदय उलुन मम जाया
पाहिल तुज आदरील जैशी पवनसुता भू-तनया,
एकचित्त ऐकेल त्या पुढे, सतींस मित्राकडुन
निरोप पतिचा म्हणजे भेटच जरा त्यांत जरि न्यून

१०४

तामायुष्मन् मम च वचनादात्मनश्चोपकर्तुं
ब्रुया एवं तव सहचरो रामगिर्याश्रमस्थः ।
अव्यापन्नः कुशलमबले पृच्छति त्वां वियुक्तः
पूर्वाभाष्यं सुलभविपदां प्राणिनामेतदेव ।।

माझें कार्य म्हणून, कराया स्वतांसहि कृतकार्य,
सांगावें, "तव रामगिरीवर सखा साहुनी विरह,
जीव धरुनिया वसे आश्रमीं पुशितो तो तव क्षेम
सहज आपदा मनुजा यास्तव हेंच पुसावें प्रथम

१०५

अङ्गेनाङ्गं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तं
सास्रेणाश्रुद्रुतमविरतोत्कण्ठमुत्कण्ठितेन ।
उष्णोच्छ्वासं समधिकतरोच्छ्वासिना दूरवर्ती
संकल्पैस्तैर्विशति विधिना वैरिणा रुद्धमार्गः ।।

"कृश तो कृशतर तूं त्याच्याहून असशी विरहे तप्त
तो उत्कंठित त्याच्याहुन तूं, उभय अश्रु ढाळीत,
उसासतों तो तूं पण, देहा देहें विळखू बघतां
दुरुनि मनोर्मानं, वैरी विधि परि ठेवी अडवुनी वाटा

१०६

शब्दाख्येयं यदपि किल ते यः सखीनां पुरस्तात्
कर्णे लोलः कथयितुमभूदाननस्पर्शलोभात् ।
सोऽतिक्रान्तः श्रवणविषयं लोचनाभ्यामदृष्ट-
स्त्वामुत्कण्ठाविरचितपदं मन्मुखेनेदमाह ।।

" तुझ्या सख्यांच्या समोर वदण्या जोगें असलें तरि तें
कानिं जो गुज कथण्या उत्सुक मुखलगटीच्या लोभें,
तो श्रवणाच्या आज पलिकडे., दिसतहि ना दृष्टीला
उत्कण्ठित मनिं शब्द जुळवुनी वदे मन्मुखें तुजला

१०७

श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान् ।
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासान्
हन्तैकस्मिन् क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति ।।

' श्याम लतेमधि शरीर , डोळे बुजऱ्या हरिणीनयनीं
चंद्रमंडळीं तव मुखमंडळ कुंतल मोरपिसारीं,
झिळमिळ लहरित निळावन्तिच्या भ्रूनर्तन तव पाही
एक्या ठायीं हाय चाण्डिके परि न साम्य कोठेही

१०८

त्वामालिख्य प्रणयकुपितां धातुरागैः शिलाया-
मात्मानं ते चरणपतितं यावदिच्छामि कर्तुम् ।
अस्त्रैस्तावन्मुहुरुपचितैर्दृष्टिरालुप्यते मे
क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगतं नौ कृतान्तः ।।

लटका राग तुझा पाषाणीं कावेनें चित्रून
प्रसंग ऐसा रेखूं पाहें तव पायीं मी शरण,
फिरफिरुनी दाटति अश्रु मग मला दिसेनाचसें होई
चित्रांतिलही अपुलें मीलन क्रूर दैव ना साही

१०९

मामाकाशप्रणिहितभुजं निर्दयाश्लेषहेतो-
र्लब्धायास्ते कथमपि मया स्वप्नसंदर्शनेषु ।
पश्यन्तीनां न खलु बहुशो न स्थलीदेवतानां
मुक्तास्थूलास्तरुकिसलयेष्वश्रुलेशाः पतन्ति ।।

कधिं भाग्यानें दिसशी स्वप्नीं तेव्हा आकाशांत
मी पसरीतों बाहू तुजला घ्याया घट्ट मिठींत,
पाहुनि हे वनदेवी रडती टपोर मोत्यावाणी
कान्ते त्यांचे आसूं गळती रानीं पानोपानीं

११०

भित्त्वा सद्यः किसलयपुटान् देवदारुद्रुमाणां
ये तत्क्षीरस्त्रुतिसुरभयो दक्षिणेन प्रवृत्ताः।
आलिङ्ग्यन्ते गुणवति मया ते तुषाराद्रिवाताः
पूर्वं स्पृष्टं यदि किल भवेदङ्गमेभिस्तवेति ।।

देवतरूंच्या नुकत्या फुटल्या पालवीस झडपून
चीक त्यांतुनी गळतां त्याच्या सुगंधांत माखून
हिमगिरिवरचे दक्षिणेकडे येती ते मी वारे
तुला स्पर्शुनी आले समजुनि आलिंगीतों, गुणिले

१११

संक्षिप्येत क्षण इव कथं दीर्घयामा त्रियामा
सर्वावस्थास्वहरपि कथं मन्दमन्दतपं स्यात्।
इत्थं चेतश्चटुलनयने दुर्लभप्रार्थनं मे
गाढोष्माभिः कृतमशरणं त्वद्वियोगव्यथाभिः ।।

त्रि-प्रहरांची रात्र लांबडी क्षणांत संपुन जावी
उन्हें रवीचीं दिवसामाजीं त्रिकाळ सौम्य रहावीं,
अशा विलक्षण मनीं कल्पना मनांत माझ्या उठती
विरहव्यथेच्या झळिनि मनाच्या शक्ति पांगुळताती

११२

नन्वात्मानं वहु विगणयन्नात्मनैवावलम्बे
तत् कल्याणि त्वमपि नितरां मा गमः कातरत्वम् ।
कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
निचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।।

**नाना रचुनी मनोरथ मला मीच धीर देतो ना ?**
**तूं पण सखये मनास सावर इतुकी भिऊं नको ना,**
**सतत दुःख वा सतत सुख जगीं कुणा कधीं कां मिळतें ?**
**रहाटापरी भाग्यचक्रहि खालीवरती भ्रमतें**

११३

शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणौ
शेषान् मासान् गमय चतुरो लोचने मीलयित्वा ।
पश्चादावां विरहगुणितं तं तमात्माभिलाषं
निर्वेक्ष्यावः परिणतशरच्चन्द्रिकासु क्षपासु ।।

**सर्प-शेज सोडोनी श्रीहरि उठतां शाप सरेल**
**डोळे मिटुनी चौमहिन्यांचा काढी उरला काळ,**
**तूं आणिक मी मनोरथ सखे विरहीं जे जे रचिले**
**पुरवूं मग शरदाच्या रात्रीं ज्यांत चांदणें फुलले.'**

११४

भूयश्चाह त्वमपि शयने कण्ठलग्ना पुरा मे
निद्रां गत्वा किमपि रुदती सस्वरं विप्रबुद्धा ।
सान्तर्हासं कथितमसकृत् पृच्छतश्च त्वया मे
दृष्टः स्वप्ने कितव रमयन् कामपि त्वं मयेति ।।

पुन्हा वदे तो ' शयनिं एकदा बिलगुनि मज निजलीस
नीज उडाली जागी होतां स्फुंदुनिया रडलीस,
परोपरीनी पुसतां हासू दाबुन मग सांगितलें
' लबाडा तुला दुजीस स्वप्नीं रमवीता देखियलें.'

११५

एतस्मान्मां कुशलिनमभिज्ञानदानाद्विदित्वा
मा कौलीनाच्चकितनयने मय्यविश्वासिनी भूः ।
स्नेहानाहुः किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगा-
दिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति ।।

खुणेवरुन या ओळख की मी आहे येथ खुशाल
ऐकुनि लोकापवाद न करीं मजविषयीं संदेह
कुणी वदति की विरहे लोपे स्नेह अभोगापायीं
स्वप्रिय मिळे न जों तरि वाढे प्रेम शिगेला जाई' "

११६

कच्चित् सौम्य व्यवसितमिदं बन्धुकृत्यं त्वया मे ।
प्रत्यादेशान्न खलु भवतो धीरतां कल्पयामि
निःशब्दोऽपि प्रदिशसि जलं याचितं चातकेभ्यः
प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव ।।

बन्धुकार्य करण्याचे सदया ठरवलेंस ना आजी ?
मानी मी कीं मौन तुझें बा म्हणजे ना नाराजी,
शब्द न बोलसि परी देशि जल चातक जेव्हा याची
पुरवुन वांछा उत्तर द्यावें हीच रीति सुजनांची

११७

एतत् कृत्वा प्रियमनुचितप्रार्थनावर्तिनो मे
सौहार्दाद्वा विधुर इति वा मय्यनुक्रोशबुद्धया ।
इष्टान् देशाञ्जलद विचर प्रावृषा संभृतश्री-
र्मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः ।।

दा. क्र.

जरी वाटली अनुचित गळ तरि इतुकें काम करून,
स्नेहास्तव वा मम विरहास्तव अनुकंपा राखून
सराइ-साजे सजल्या देशीं जा तुज जे जे रुचती
पळभरहि न हो तुझी विजेची ऐशी ताटातूटी

## ( शुद्धिपत्र : मराठी अनुवादातील )

| श्लोक । चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २ । ४ | दे तो | देतो |
| १२ । १ | घ | घे |
| १३ । २ | अधुनि | अधुनी |
| १७ । २ | चालूनि | चालुनि |
| २२ । ४ | गुंतून | गुंतुनि |
| ,, | करूनि | करुनी |
| २६ । ३ | पुसून | पुसुन |
| ३१ । १ | सारसावाणी | सारस-वाणी |
| ३४ । १ | पोचशील | पोचशिल |
| ३५ । ३ | नव | तव |
| ४१ । २ | नीर | नील |
| ४२ । ४ | निघशील | निघशिल |
| ५० । ३ | तरी | तरि |
| ५२ । ३ | घालाव | घालवि |
| ८३ । १ | काढसख्या | काढि सख्या |
| ८५ । २ | डोळ | डोळे |
| ८७ । १ | स्वासें | श्वासें |
| १०५ । ३ | उसासतों | उसासतो |
| १०६ । ३ | पलिकडे., | पलिकडे, |

REFBK-0014067
REFBK-0014067